# ठाणे महापौर छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न

◆ ठाणे/प्रतिनिधी

**दि. २६ : ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटी, ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ठाणे महापौर छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन गडकरी रंगायतनमध्ये महापौर सौ. शारदा राऊत, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे, भाजपा विभागीय अध्यक्ष संजय केळकर व इतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.**

समारंभाच्या सुरुवातीला ठाणे शहरामधील ज्येष्ठ फोटोग्राफर व इतिहास संशोधक हरीभाऊ शेजवळ यांचे हस्ते फित कापण्यात आली. त्यानंतर रंगायतनच्या हिरवळीवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात या कार्यक्रमाचे उद्घाटक व सुप्रसिद्ध कला निर्देशक नितीन देसाई, महापौर सौ. शारदा राऊत व इतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यंदा ह्या स्पर्धेचे ३ वर्ष असून, या स्पर्धेमध्ये जवळपास ६५० स्पर्धकांनी ठाणे जिल्ह्यामधून भाग घेतला आहे. हे प्रदर्शन नागरिकांसाठी स. १० पासून रात्रौ ९ वाजेपर्यंत विनामूल्य खुले राहणार आहे. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ रविवार २७ ऑक्टो. रोजी संपन्न होणार आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी सभापती स्थायी समिती गोपाळ लांडगे, सभागृह नेते एकनाथ शिंदे, विरोधी पक्ष नेता सुभाष भोईर, शिवसेना शहर प्रमुख नरेश म्हस्के, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती दिलीप बारटक्के, माध्यमिक शिक्षण समिती सभापती राजेंद्र साप्ते, आरोग्य समिती सभापती दत्ताराम मोरे माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक मनोहर गाढवे, ज्येष्ठ नगरसेवक राजन विचारे, मधुकर देशमुख, संदिप लेले, संजय वाघुले, श्याम पाटील, सौ. माधवी नाईक, स्वीकृत सदस्य यशवंत अशिनकर फोटो सर्कल सोसायटीचे अध्यक्ष संजोग हाटे, अश्वीन व्यास, नयन तांबोटकर, इतर सदस्य व छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.